हि.वि.अर्ज.क्र. २७/२०२३
शंतनु वि. शितल
निशाणी क्र. २० क्रमश :

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुढील सरतपास अर्जदाराचे वकिल श्री.डी.व्ही. फुसे यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

७. मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे.

८. मी या प्रकरणात निशाणी ३ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. १ ला पोस्टाची पावती दाखल केली आहे. तसेच अ.क्र. २ ला मी दिनांक २५.०१.२०२३ रोजी मी माइया वकीलांच्या मार्फत गैरअर्जदाराला पाठविलेल्या नोटीसीची स्थळप्रत दाखल केली आहे. सदर पोस्टाची पावती व नोटीसीची स्थळप्रत यातील मजकुर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी २४ व २५** देण्यात येत आहे. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. ३ व ४ ला त्याच नोटीसीबाबतचा पोस्टाचा ट्रॅक रिपोर्ट व पोचपावती दाखल केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी २६ व २७** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. ५ ला दिनांक १२.११.२०२२ रोजी झालेल्या लोकन्यायालयात हिंदु विवाह अर्ज क्रमांक ७७/२०२१ मध्ये झालेला समजोता व त्याबाबतची पुरसीस व त्यावरील आदेश याच्या प्रमाणीत प्रती दाखल केल्या आहेत. त्यास एकत्रितरीत्या **निशाणी २८** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. ६ ला हिंदु विवाह अर्ज क्रमांक ७७/२०२१ मधील निशाणी १ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी २९** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**गैरअर्जदाराच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दि. ०२.०४.२०२५.

( महेश एस. काळे )
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**